शिवाजी पराडे वि.

बबन शिवराम पराडे व इतर १

CNRNOMHSO10001002019

**नियमित दिवाणी दावा क्र.१३९/२०१९ मधील**

**निशाणी २९५, २९७, खालील आदेश**

**(जुना नियमित दिवाणी दावा क्र.३३/२००७)**

(दिनांक–१५/०७/२०२४)

वादीने अर्ज नि.क्र.२९५ हा पुरावा सुरु करण्याची परवानगी द्यावी यासाठी दिला आहे. अर्ज नि.क्र.२९७ मोजणी प्रकरण क्र.४६२/११ मधील ''अ'' शिट न्यायालयात जमा करण्यासाठी उपअधिक्षक भुमीअभिलेख, माळशिरस यांना आदेश व्हावा, यासाठी दिला आहे व अर्ज नि.क्र.२९९ हा उपअधिक्षक, भुमी अभिलेख यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती व्हावी व त्यांनी मौजे संगम, ता.माळशिरस येथील गट नं.४२/१अ, ४२/१/ब/१, ४२/१/ब/२, ४२/१/क ग.नं. ४२/२ ४२/३, ४२/४/अ, ४२/५, ४२/४/इ, ४२/क, ४२/४/ड/१, ४२/४/ड/२ व प्रतिवादीचा ग.नं.४१/१ व ४१/२ एकत्रीत मोजणी व्हावी व मोजणी करताना वाद मिळकतीत असणारी घरे रस्ते इ. सर्व बाबी नकाशामध्ये दर्शविण्यात यावेत यासाठी अर्ज केला आहे.

२ **<u>नियमित दि.दा.क्र.१३९/२०१९(नि.२९५,२९७)</u>**

<u>शिवाजी पराडे वि.बबन शिवराम पराडे व इतर १</u>

२. हे तिन्ही अर्ज मोजणी प्रकरण क्र.४६२/२०११ मधील मोजणीनुसार, तयार केलेल्या नकाशामध्ये वादी व प्रतिवादीच्या जमीनीचे पोटहिस्से दर्शविले नाहीत, त्यामुळे नकाशामध्ये दोष आहेत, त्यामुळे ग.नं.४२ चे सर्व पोटहिस्से व प्रतिवादीचा ग.नं.४१ चे सर्व पोटहिस्से यांची एकत्रीत मोजणी व्हावी यासाठी अर्ज केला आहे.

३. मोजणी प्रकरण क्र.४६२/२०११ मधील मोजणी नकाशा ''अ'' शिट साक्षीदाराने सोबत आणली होती, परंतु साक्ष झाल्यानंतर सदर शिट परत नेले आहे, ती शिट न्यायालयात परत मागितले तर प्रतिवादीचे काही नुकसान होणार नाही. या सर्व कारणामुळे वादीस परत पुरावा सुरु करण्याची परवानगी द्यावी.

४. प्रतिवादीने नि.क्र.३०१ वर या तिन्ही अर्जाला उत्तर दिले आहे. वादीने मुळचा दावा, दावा मिळकत प्रतिवादीस परवानगीने वापरणेसाठी दिली होती. दिलेली परवानगी रद्द करुन मिळकतीचा कब्जा मागणी केली आहे. तथापी दाव्यात पुढे दुरुस्ती करुन परवानगीची मागणी सोडून ३३आर अतिक्रमण क्षेत्राची विसंगत मागणी करुन दाव्याचे कामकाज सुरु होवून वादीचा पुरावा झालेला आहे. मोजणीदाराने

स्वतंत्र पुरावा दिलेला आहे. वादीने पुरावा बंद केला आहे व प्रतिवादीचा पुरावा सुरु झालेला आहे. प्रतिवादी व त्यांच्या साक्षीदाराचा सरतपास पुर्वीच झालेला आहे, दावा युक्तीवादासाठी नेमला आहे. वादीने पुर्वी नि.क्र.८५ वर अर्ज देवून वादीची दावा मिळकत ४/४ व प्रतिवादीची ग.नं.४१/१ ची मोजणी करुन मागितली होती, तो अर्ज मंजूर झाला, त्याची मोजणी होवून नि.क्र.१९१ अन्वये मोजणीदाराची साक्ष झालेली आहे, परंतु त्रुटी भरुन काढण्यासाठी हा अर्ज दिलेला आहे. पहिली झालेली मोजणी व त्याचा नकाशा रद्द झाल्याशिवाय दुसरी मोजणी मागता येणार नाही. म्हणून म्हणून अर्ज नामंजूर करावा.

५. मी वादी व प्रतिवादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. नि.क्र.८५ वरील आदेशानुसार, ग.नं.४१/१ व ४२/४ ची मोजणी करण्याचा आदेश झालेला आहे. त्याप्रमाणे, मोजणीदार–कोकाटे यांनी मोजणी केलेली आहे, त्यांचा पुरावा नि.क्र.१९१ वर आहे. मोजणीदार–कोकाटे यांनी पुराव्यात सांगितले की, सर्व्हे अभिलेखाप्रमाणे ग.नं.४२ ची फाळणी झालेली नाही. जेव्हा सर्व्हे अभिलेखाप्रमाणे ग.नं.४२ ची फाळणी झालेली नाही, तेव्हा त्याच्या पोटहिस्स्याची मोजणी करता

येणार नाही. युक्तीवादादरम्यान वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, ग.नं.४२ व ४१ ची मोजणी करावी. मी या युक्तीवादाशी सहकत आहे. कारण ग.नं.४२च्या धारकांनी ग.नं.४२ च्या इतर धारकांवर अतिक्रमण केले आहे का, हे सुध्दा दिसून येईल. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, पहिली मोजणी रद्द झाल्याशिवाय दुसरी मोजणी करता येणार नाही. माननीय मुंबई उच्च न्यायालय, **सुधाकर बाबूराव कुलकर्णी वि. गोराबाई थानसिंग मरग आणि इतर २०१९(३) ऑल एम आर ८२३, काशिनाथ चिंधुजी शास्त्री वि. हरीभाई नथुजी बावनखडे २००४(२) एम एच एल जे, ७२२**, **जमीरखान वि. धरमचंद रुपचंद सावला व इतर २०१८(३) ऑल एम आर ७०, वत्सलाबाई कुंडलिक गव्हाणे व इतर वि. चिंकाजी मल्हारी जाधव आणि इतर २०१२(३) ऑल एम आर ९१,** श्रीमती निरंजनाबाई चंद्रकांत विरा वि. श्रीमती प्रमिलाबाई बाळकृष्ण झाडे २००४ ए आय आर २५३४ यामध्ये आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय मुलाधार दिला आहे की, जर मोजणी चुकीची असेल तर परत मोजणी करण्यासाठी कोर्ट कमिशनरची नियुक्ती करता येते. याविरुध्द प्रतिवादीच्या विधीज्ञांनी **स्वामी प्रेमानंद भारती वि.स्वामी योगनंदा भारती व इतर, ए आय आर १९८५ केरळा ८३, आदमल व इतर वि. पोसारी विलय्या गोंडेर ए आय**

**<u>आर १९९९ मद्रास ३९०</u>** यामध्ये वस्तुस्थीती अतिक्रमणाबद्दलची नाही, त्यामुळे आदरणीय केरळ व मद्रास न्यायालयाचा निर्णय मुलाधार या अर्जाला लागु होणार नाही.

६. म्हणून जरी वादीने स्वतःचा पुरावा बंद केला तरी पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी वादीला पुरावा चालू करण्याची परवानगी दिली तर वादीचे नुकसान होणार नाही. कोर्ट कमिशनर मोजणीदार यांच्या पुराव्यानुसार त्यांनी मोजणी प्रकरण क्र.४६२/२०११ चा मोजणीचा नकाशा ''अ'' आलेख पुरावा झाल्यानंतर परत नेला आहे. ''अ'' आलेखवरुन ''ब'' आदेश मोजणीदाराने तयार केले आहे. वादी परत ग.नं.४२ व ४१ ची मोजणी करुन मागत आहे. अशा परिस्थीतीत ''ब'' आलेख दाव्यात दाखल असताना परत ''अ'' आलेख बोलावण्याची काही गरज वाटत नाही. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो

**<u>आदेश</u>**

१. वादीला पुरावा चालू करण्याची परवानगी दिली आहे.

६ **<u>नियमित दि.दा.क्र.१३९/२०१९(नि.२९५,२९७)</u>**

<u>शिवाजी पराडे वि.बबन शिवराम पराडे व इतर १</u>

२. उपअधिक्षक भुमी अभिलेख यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक केली आहे. त्यांनी मौ.संगम येथील ग.नं.४२, ग.नं.४१ ची एकत्रीत मोजणी करावी व कोणाचे अतिक्रमण, कोणाच्या हद्दीत येते हे नकाशात स्पष्टपणे नमुद करावे.

३. मोजणी नकाशात असणारे घरे रस्ते इ. सर्व बाबी नकाशामध्ये नमुद कराव्यात.

स्वाक्षरीत/-

दिनांक -१५/०७/२०२४.

(उ.वि.जोशी)

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,

माळशिरस.